साप्ताहिक

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक : रमेश अ. शेळके
कार्यकारी संपादक-ॲड.चंद्रकांत गायकवाड

RNI NO. : MAHARAR/ 2010 / 36016
Website : nyayswatantryasamta.weebly.com

वर्ष - ५ | अंक ४७ वा | सोमवार दि. २१ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१५ | पुणे | किंमत - २ रुपये | पाने ४

## शरद पवार पहिले मराठी पंतप्रधान होऊ शकले नाहीत,हे दुर्दैव-मुख्यमंत्री

नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार हे पहिले मराठी पंतप्रधान होऊ शकले नाहीत, हे दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केली. राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात अमृतमहोत्सवी वर्षे साजरे करणार्‍या पवारांच्या अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला.



पवार यांचे अभिनंदन करणारा ठराव विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर विधान परिषदेत महसूलमंत्री एकनाथ खडसे यांनी मांडला. यशवंतरावांनंतर दुर्दैवाने तेही देशाचे पंतप्रधान होऊ शकले नाहीत असे सांगत शरद पवारांनी राजकारण करतांना वैचारिक संघर्ष जरुर केला. मात्र वैयक्तीक संघर्ष कधी केला नाही हेच त्यांचे मोठेपण आहे, असेही फडणवीस म्हणाले. शरद पवारांचे नेतृत्व हे चतुरस्त्र असे आहे. साहित्य, नाटयसृष्टी, क्रीडा, याचबरोबर सामाजिक जीवनातही त्यांचे मोठे काम आहे. आमचे एकमेकांचे विचार हे भिन्न आहेत; मात्र जेंव्हा राज्यावर आपत्ती व संकट येते त्यावेळी आम्ही एकत्र येत असतो. हे करीत असताना कोणी त्याचा वेगळा अर्थ काढतो. मी बारामतीला कृषी प्रदर्शनाच्या पाहणीसाठी गेलो तर त्याचा अर्थ राष्ट्रवादी आणि आम्ही (भाजपा) एकत्र येणार असा लावला जात होता. तर विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नगरमधील एका कार्यक्रमासाठी गेलो तर त्याचा अर्थ विखे-पाटील भाजपामध्ये येणार असे म्हटले गेले असे सांगत त्यांनी प्रसारमाध्यमांमधील चर्चेबाबतही खंत व्यक्त केली.

शरद पवार यांचे नेतृत्व उत्तुंग असून नुकताच नवी दिल्ली येथे विज्ञान भवन येथे जो सत्कार सोहळा झाला तो अभूतपूर्व असा होता. सतत ५५ वर्षे ते राजकारणात कार्यरत असून ४८ वर्षे संसदीय कामाचा दांडगा अनुभव त्यांच्यापाशी आहे. ३८ व्या वर्षी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. केंद्रात संरक्षण, कृषी इत्यादी खात्यांची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या काळात धान्य उत्पादनात देश अग्रेसर राहिला. यापूर्वी आपण धान्य आयात करीत होतो आता निर्यात करु लागलो याचे श्रेय शरद पवारांना आहे असेही ते म्हणाले. आजही या वयात ते शिस्तप्रिय असून नियोजित कार्यक्रमाची वेळ ते चुकवित नाहीत. आम्ही राजकीय विरोधक आहोत. मात्र आमची नाळ राज्यातील जनतेशी जोडली आहे हे पवारांनी दाखवून दिले आहे. ज्यावेळी राज्यापुढे अडचणी उभ्या राहतात त्यावेळी आम्ही एकत्र उभे राहून समस्या मार्गी कशा लागतील हे पाहतो असे मुख्यमंत्री म्हणाले. शरद पवार हे एक असे नेते आहेत की विरोधासाठी विरोध त्यांनी कधीही केला नाही. राज्याच्या विकासासाठी ते राजकीय वैमनस्य बाजूला ठेवत असत. सध्या राजकारण राजकीय अस्पृश्यतेकडे चालले आहे. लोकशाहीत काम करताना अशी अस्पृश्यता बाळगणे हे योग्य नाही. पवारांनी ही राजकीय अस्पृश्यता तोडली आणि पुलोद सरकार चालवले त्यात आमच्यापैकीही काही मंत्री होते याची आठवणही त्यांनी करुन दिली.

## स्मार्ट सिटी पेक्षा पाण्याचा प्रश्न सोडवा



जळगाव : शहरं स्मार्ट करण्यापेक्षा लोकांच्या पाण्याचा प्रश्न सोडवा, गावातील माता-भगिनींना जगण्यासाठी पैसे द्या, असे सांगत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज भाजपला टोला हाणला आहे. ते जळगावातील सभेत बोलत होते.

स्वाती पिटले आत्महत्या प्रकरणावरुनही उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारला धारेवर धरले. महात्मा फुलेंच्या महाराष्ट्रात मुलींना शिक्षणासाठी पैसे नाहीत, ही शरमेची बाब आहे, अशी टीकाही त्यांनी केली. स्वाती पिटलेच्या आत्महत्येनंतर तातडीने परिवहन मंत्री दिवाकर रावतेंना फोन करुन यावर उपाययोजना करण्याचे आदेश दिले आणि ४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचा प्रवास शुल्क शिवसेनेच्या पुढाकाराने माफ झाले याची आठवण करून देत त्यांनी परिवहनमंत्री दिवाकर रावते यांच्या निर्णयाचे कौतुक केले.

ते म्हणाले, शेतकर्‍यांचे जीवन सुसह्य करणे, हे शिवसेनेचे ध्येय आहे. राज्यातील जनतेने आमच्यावर दाखवलेला विश्वास आम्ही सार्थ करुन दाखवू. शिवाय, जो मंत्री जनतेला वेळ देणार नाही, अशा मंत्र्याला शिवसेनेत अजिबात स्थान नाही. माझी भूमिका विरोधाची नाही. सत्तेत राहून विरोध करायला मी कपाळकरंटा नाही. शिवसेनेचा दुष्काळ दौरा म्हणजे थोतांड नाही. शहरे स्मार्ट करण्यापेक्षा गावातील माझ्या माता-भगिनींना जगण्यासाठी पैसे द्या, पाणी द्या. शिवसेना जी बोलते, ते करुन दाखवते.

## हरियाना:पालिका निवडणुकीसाठी बारावीची अट

चंडीगड- पालिका निवडणूक लढविण्यासाठी बारावीपर्यंतच्या शिक्षणाची अट घालण्याचा विचार हरियानातील मनोहरलाल खट्टर सरकार करीत आहे. शासनाने यापूर्वी निवडणूक लढविण्यासाठी किमान शिक्षणाची अट घातली आहे.

हरियानाच्या ॲडव्होकेट जनरलच्या कार्यालयाने उमेदवारांसाठी शैक्षणिक पात्रता काय असावी याबाबत सूचना मागिविल्या आहेत. जे उमेदवार पालिका निवडणूक लढवू इच्छितात, अशा उमेदवारांचे शिक्षण बारावी आणि नगर परिषदेसाठी दहावीच्या शिक्षणाची अट घालण्याचा विचार सरकार करीत आहे.

## निर्भयाप्रकरणातील बालगुन्हेगार अखेर सुटला

नवी दिल्ली : निर्भयाप्रकरणातील बालगुन्हेगाराची अखेर सुटका झाली आहे. त्या बालगुन्हेगाराला एका स्वयंसेवी संस्थेकडे सोपवण्यात आले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव त्याला दिल्ली पोलिसांनी अज्ञातस्थळी हलवले असून त्याची नवी ओळख आणि ठिकाणा उघड केला जाणार नाही.



बालगुन्हेगाराची सुटका होऊ नये म्हणून निर्भयाच्या पालकांसह काही सामाजिक संस्थांनी अनेक प्रयत्न केले होते. मात्र ते प्रयत्न असफल ठरले आहेत. या बालगुन्हेगाराला फाशी द्या, त्याला सोडू नका अशी मागणी करीत निर्भयाच्या संतप्त पालकांनी दिल्लीतल्या इंडिया गेटबाहेर सलग दुसर्‍या दिवशीही निदर्शने केली. मात्र पालकांना विरोध करत पोलिसांनी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. याआधी निर्भयाच्या आईने गुन्हेगाराला सोडू नये यासाठी बालसुधारगृहाबाहेर आंदोलन केले होते. यावेळी पोलिसांनी निर्भयाच्या आईला ताब्यात घेऊन थोड्या वेळाने सोडले.

सदर बालगुन्हेगाराला सोडू नये यासाठी दिल्ली महिला आयोगाने सर्वोच्च न्यायालयात मध्यरात्री याचिका दाखल केली होती. मात्र, बालगुन्हेगाराच्या सुटकेला स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दर्शविला. त्यामुळे त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला होता. महत्त्वाचे म्हणजे १६ डिसेंबर २०१२ रोजी ही धक्कादायक घटना घडली, त्यावेळी या आरोपीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यास काही महिन्यांचा अवधी होता. त्याला शिक्षा सुनावली तेव्हा त्याने १८ वर्षे पूर्ण केली होती.

मात्र गुन्हा घडला तेव्हा तो अल्पवयीन असल्याचे गृहित धरल्याने त्याला फायदा मिळाला. आता हाच नराधम २१ वर्षाचा झाला आहे. उत्तर प्रदेशच्या बदाऊनमध्ये असलेल्या त्याच्या घरी पाठवायचे की स्वयंसेवी संस्थेकडे असा प्रश्न निर्माण झाला असता, सुरक्षेच्या कारणास्तव बालगुन्हेगाराला स्वयंसेवी संस्थेच्या हवाली करण्यात आले आहे.

मी रस्त्यावर उभी राहून ओरडत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी योगा शिकण्यात व्यस्त होते. त्यांना फिरण्यातून वेळच मिळत नाही. देशात काय चाललेय याची त्यांना माहितीच नाही. कायदा व्यवस्था आणि प्रशासन अजूनही आमचे दुःख समजू शकलेले नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया सामूहिक बलात्काराला बळी पडलेल्या निर्भयाच्या आईने दिली आहे. तसेच, दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्ष स्वाती मालीवाल यांनी सकाळीच सर्वोच्च न्यायालयात दाद का मागितली नाही, असा सवाल निर्भयाच्या आईने केला असून, ही निव्वळ दिशाभूल असल्याचा आरोप केला आहे.

# संपादकीय...

## २५ डिसेंबर

याच दिवशी सन १९५५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देहूरोड या ठिकाणी बुध्द मुर्तीची प्रतिष्ठापना केली. तेंव्हापासून ते आजतागायत आंबेडकर अनुयायी या स्थळाला सहपरिवार भेट देऊन. भगवान गौतम बुध्दांच्या तत्वांचे आचरण करण्याची प्रेरणा घेण्यासाठी स्वयंप्रेरणेने दाखल होतात. या घटनेचे वैशिष्ट म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी १४ ऑक्टोंबर १९५६ साली ५ लाख अनुयायांसमवेत बौध्द धम्माची दिक्षा घेतली हे जग जाहीर आहे. त्यापूर्वी केलेली बुध्द मुर्तीची प्रतिष्ठापना, आंबेडकर अनुयायीना विचार करायला भाग पाडते. डॉ. बाबासाहेबांनी जेंव्हा या बुध्दमुर्तीची प्रतिष्ठापना केली. तेंव्हा या मुर्तीची विधीवत पुजा कशी करायची हे कोणालाही माहित नव्हते. जनता संभ्रमात होती. डॉ. आंबेडकरांनी धम्मदिक्षा घेण्यापूर्वी ही प्रतिष्ठापना करून, प्रस्थापितांना एक प्रकारे इशारा दिला असावा असे जाणवते. बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा करून अनेक वर्षे लोटली होती. प्रत्येक धर्माचे पंडीत, बाबासाहेबांना आमच्या धर्मात यावे म्हणून साकडे घालीत होते. परंतु बाबासाहेबांनी याच भूमीत रूजलेल्या बौध्दधर्माची दिक्षा घेऊन भारतात, बौध्द धर्माची पुर्णबीज रोपणी केल्याचे दिसते. तेंव्हापासून ते आजपर्यंत लोकसंख्येच्या १५ टक्के असलेला हा बौध्दधर्मीय, सरकारी कागदोपत्री फक्त एक कोटीच्या आसपास नोंदणीकृत असलेला दिसतो हे दुर्देवी आहे. १५ टक्के असलेला हा समाज, आपले सर्व विधी, नामकरण ते अंत्यविधी पर्यंत बौध्द पध्दतीने करत असल्याचे निदर्शनास येते, ।।बुध्द सरणं गच्छामीचे।। स्वर,प्रत्येकाच्या घरात ऐकू येत असून ही कागदोपत्री १५ कोटी का नाही. याचा विचार करणे गरजेचे आहे.

बौध्द धर्माची दिक्षा घेऊन अर्धशतक उलटले तरी बौध्द विवाह कायदा झालेला नाही. बौध्द विवाह कायदा न झाल्याने आपल्या विवाह पध्दतीवर प्रश्नचिन्ह उभे राहते.

प्रत्येक बौध्द अनुयायीनी बौध्द विवाह कायद्याचा आग्रह धरला पाहिजे. ज्येष्ठ साहित्यिक ॲड. दिलीप काकडे, यावर जनजागरण करून सरकारकडे पाठपुरावा करताना दिसतात. त्यांच्या पाठीशी सर्व समाजाने उभे राहिले पाहिजे. बौध्द विवाह कायदा मंजुरीसाठी आवश्यक असणारी बौध्दांची संख्या, कागदोपत्री नगण्य असल्याने याचा विचार होत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सर्वांनी आपल्या शाळेच्या दाखल्यावर, बौध्द म्हणून लिहिले पाहीजे. तेंव्हाच आकडेवारी वाढेल व अल्पसंख्यांकाच्या सुविधा आपल्याला घेता येतील.

येथे सहपरिवार येणारी जनता सुज्ञ व विज्ञानाशी नाते सांगणारी आहे. त्यांनी जर या गोष्टीचा आग्रह धरला व मनापासून प्रचार व प्रसार केला तर, बौध्द विवाह कायदा नक्की लागू होईल. व सर्व समाज पंचशीलेच्या झेंड्याखाली एकत्र आल्याशिवाय राहणार नाही. संपुर्ण जगात नाताळाची धूम आहे. सर्वजण आनंदोत्सव साजरा करतात. जग आनंदोत्सवात मग्न असतानाच बाबासाहेबांनी अनुयायींचे याच दिवशी प्रतिष्ठापणा करून भगवान बुध्दांच्या मार्गावर चालण्यासाठी आपल्याला प्रेरीत केल्याचे दिसते.

अनुयायींना या दिवशी सकल्प केला पाहिजे की, आम्ही बौध्दधर्माची कास सोडणार नाही. याच मार्गाने पुढे जाणार तरच हा दिवस सार्थकी लागल्याचे सिध्द होईल.

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.

(या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

# २६-११ हल्ल्यातील पाकचा बुरखा फाटणार

मुंबईतील २६-११च्या दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सूत्रधार डेव्हिड हेडलीची १० डिसेंबरला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात साक्ष नोंदविण्यात आली. यावेळी त्याने शिक्षा माफ झाली तर माफीचा साक्षीदार होण्यास तयार असल्याचे न्यायालयात सांगितले. त्यानंतर न्यायालयाने त्याला माफी देऊन माफीचा साक्षीदार बनविले.

मुंबईतील २६-११च्या दहशतवादी हल्ल्यातील गन्ह्यांची कबुली त्याने दिली. यावेळी त्याने शिक्षा माफ झाली तर माफीचा साक्षीदार होण्यास तयार असल्याचे सांगितले. दरम्यान याप्रकरणी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी तपास अधिकार्यासोबत सल्ला-मसलत करण्यासाठी काही वेळ मागितला. त्यानंतर न्यायालयाने त्याला माफी देऊन माफीचा साक्षीदार बनविण्याचा निर्णय घेतला. डेव्हिड हेडली हा लष्कर-ए-तयब्बाचा या दहशतवादी संघटनेचा सदस्य असून मुंबईतील २६-११च्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी अमेरिकेतील तुरुंगात तो ३५ वर्षाची शिक्षा भोगत आहे.

२६-११च्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी डेव्हिड कोलमन हेडली माफीचा साक्षीदार झाल्याने पाकिस्तानचा खरा चेहरा उघड होणार आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या कटाची माहिती जगासमोर येणार असून पाकिस्तान आणि आयएसआयचे पितळ उघडे पडणार आहे. कारण हेडली माफीचा साक्षीदार बनला आहे. हा हल्ला कोणी आणि कसा केला, त्याचे षडयंत्र कोणी रचले होते हे सगळे काही उघड होणार आहे. अमेरिकेच्या ताब्यात असलेला हेडली भारतीय न्यायालयाला ही सगळी माहिती देणार आहे.

मुंबई सत्र न्यायालयात सुरु असलेल्या २६-११च्या खटल्यात हेडली ४ अटींवर माफीचा साक्षीदार बनला आहे. जकीउर रेहमान लखवी, अबू जुंदाल आणि डेव्हिड हेडली हे तिघेजण २६-११च्या हल्ल्याचे मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात उघड झाले आहे. भारताने अमेरिकेकडे डेव्हिड हेडलीला ताब्यात देण्याची मागणी केली होती. तो अमेरिकन नागरिक असल्याने आणि त्याने स्वतः गुन्हे कबूल केल्याने अमेरिकेने हेडलीला भारताच्या स्वाधीन करण्यास नकार दिला. मात्र केंद्र सरकारच्या पाठपुराव्यामुळे त्याची व्हिडीओ कॉन्फन्सिंगद्वारे साक्ष घेणे शक्य झाले. जकीउर रेहमान लखवीचे पाकिस्तान सरकार, आयएसआय आणि लष्कर ए तैय्यबाशी असेले संबंध उघड होणार आहेत. या दहशतवादी हल्ल्यातील फरार आणि संशयित आरोपींची माहिती मिळणार आहे. हेडलीच्या साक्षीचे अनेक फायदे या खटल्यासाठी होणार आहेत.

चार अटी

१) मुंबईवर झालेल्या २६-११ च्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भातील सर्व माहिती हेडलीला सांगावी लागणार.

२) २६-११ दहशतवादी हल्ल्यातील हेडलीची काय भूमिका होती.

३) २६-११ च्या हल्ल्यातील सर्व संशयितांबद्दल हेडलीने अमेरिकन न्यायालयाला दिली आहे ती सर्व माहिती विशेष न्यायालयाला द्यायची.

४) माफीचा साक्षीदार झाल्यास हेडलीला विशेष सरकारी वकील सुनावणी दरम्यान जे प्रश्न विचारतील त्यांची सर्व खरी आणि स्पष्ट उत्तरे द्यावी लागतील.

गुजरात पोलिसांशी चकमकीत मारली गेलेली इशरत जहां ही लष्कर ए तोयबाची आत्मघातकी दहशतवादी हल्लेखोर होती. इशरत हिला लष्करच्या मुजामिल याने आपल्या ग्रुपमध्ये सामील केले होते. डेव्हिड हेडली याने राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि कायदे विभागाच्या चमूला शिकागोमध्ये ही माहिती दिली. हेडलीच्या या खुलाशानंतर गुजरात पोलीस आणि केंद्राच्या भूमिकेला पुष्टी मिळाली. इशरत १५ जून २००४ रोजी जावेद शेख ऊर्फ प्रणेश पिल्लई आणि पाक तरुण अमजद अली आणि जीशान जोहर अब्दुल गनी यांच्यासोबत एन्काऊंटरमध्ये मारली गेली होती. इशरत जहाँ ही कॉलेज तरुणी होती, सेल्समन होती. निरपराध होती. तिला विनाकारण पोलिसांनी बनावट चकमक करून मारले. तिचा खून केला, असा कांगावा करून प्रचंड गदारोळ माजविला गेला. काही आमदारांनी आमदार निधीतून इशरत जहाँच्या कुटुंबीयांना मदतही केली होती. वास्तविक इशरत जहाँ ही अतिरेकी होती ही काही माहिती आता हेडलीने माफीचा साक्षीदार म्हणून साक्ष दिली आणि पुढे आली असे नाही. ही घटना घडली त्यावेळी दहा वर्षापूर्वीही याला दुजोरा देणारे अनेक मुद्दे पुढे आले होते. मात्र, या माहितीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले गेले.

काँग्रेसचे केंद्रात सरकार असताना तपास यंत्रणेचे अधिकारी जेव्हा अमेरिकेत हेडलीचा जबाब घेण्यासाठी गेले होते, तेव्हा त्यांनाही हेडलीने इशरत जहाँ लष्कर ए तोयबाच्या आत्मघातकी पथकाची सदस्य होती हे सांगितले होते. मात्र, या हेडलीच्या दाव्याला सिद्ध करणारे पुरावे नाहीत, असे कारण सांगून त्याच्या जबाबातील हा भाग काढून टाकण्यात आला.

अनेक प्रसारमाध्यमे यांची विश्वाससार्हता या इशरत प्रकरणात पूर्णपणे मोडीत निघाली आहे. हेडलीने जबाब दिल्यावरही एरवी दिवसरात्र एकच विषय घोळविणारी प्रसारमाध्यमे या विषयावर कुलूप तोंडाला घालून गप्प आहेत. चर्चेचे रतीब घालणारे हेडलीच्या या जबाबावर चकार शब्द बोलायला तयार नाहीत. हेडली माफीचा साक्षीदार झाल्याने २६-११च्या हल्ल्याच्या तपासात अनेक गोष्टी पुढे येण्याची शक्यता आहे. हेडलीने चार अटी मान्य केल्याने या अटींवर आधारित २६-११ च्या हल्ल्याच्या खटल्यासाठी हेडलीचा जबाब ८ फेब्रवारी २०१६ रोजी रेकॉर्ड केला जाईल. या खटल्याची पुढील सुनावणी ८ फेब्रुवारी रोजी ठेवण्यात आली आहे.

हेडली डबल नव्हे चौघांचा हा एजन्ट होता, तो अमेरिकेच्या ड्रग इनफोर्सेट ॲडमिनिस्ट्रेशन (डीइए), द फेडरल ब्युरो ऑफ इनव्हेस्टिगेशन (एफबीआय), द सेंट्रल इन्टेलिजन्स एजन्सी (सीआयए) आणि लष्कर-ए-तोयबा (एलइटी) यांच्यासाठी काम करत होता. त्याचे अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याशी असणारे संबंध न्यायालयात समोर येऊ नयेत यासाठी सर्व पुरावे नष्ट करण्याचा करार एफबीआयने त्याच्या बरोबर आधीच केला होता. एफबीआय त्याला भारताच्या हवाली करणार नाही आणि त्याचे अमेरिकेच्या व पाकिस्तानच्या गुप्तहेर खात्याबरोबर असणार्या संबंधांबाबत भारतीय तपास यंत्रणांनी त्याला कोणतेही प्रश्न विचारू नयेत, यासाठी भारतीय यंत्रणांना त्याची चौकशी करण्याची परवानगी अमेरिका कधीही देणार नाही. त्याच्या विरोधात कोणतीही उलट तपासणी होणार नाही. एफबीआयसाठी हे महत्वाचे आहे की लष्कर ए तय्यबाला मुंबईवरील हल्ल्यासाठी जबाबदार धरावे. ज्यामुळे या संघटनेवर पाकिस्तानला कारवाई करावी लागेल.

लष्कर-ए-तोयबाविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाकिस्तानवर गफारसा दबाव अमेरिकेने आणला नाही. त्याचे कारण हेडलीचा अमेरिकेसाठीच्या हेरगिरीत दडले आहे. थोडक्यात हेडली हा डबल एजंट होता. उद्या हेडलीची खरीखुरी माहिती जगापुढे आली तर अमेरिकेचा दुटप्पीपणा जगापुढे येईल, अशी शक्यता होती. पण अमेरिकेने मोठय़ा मुत्सद्दीपणे हा प्रकरण हाताळले. अमेरिकेच्या या प्रकरणातील एकंदर वागण्यावरून भारतीय यंत्रणेने बोध घ्यायला हरकत नाही. यापूर्वी भारतात झालेल्या अनेक घातपातांचे धागेदोरे हाती आलेले नाहीत. या उलट आपले सहा नागरिक मुंबई हल्ल्यात मारले गेल्यानंतर ज्या गतीने अमेरिकेने हेडली आणि राणा यांना अटक केली, त्यावरून या देशांची गुप्तचर यंत्रणांची ताकद किती आहे ते दिसून आले. भविष्यात अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करून त्याचा आदर्श ठेवण्यात भारताला हरकत नसावी.

मुंबईवरच्या हल्ल्यातील प्रमुख आरोपी डेव्हिड हेडली हा माफीचा साक्षीदार बनला आहे. त्याच्या साक्षीमुळे मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यामागचा पाकिस्तानचा नापाक आणि हिंस्र चेहरा जगासमोर उघडा पडणार आहे. या देशात राहूनही जिथे तिथे राजकीय फायदा पाहणार्या, त्यासाठी वाट्टेल त्या थराला जाऊन देशाचे नुकसान करणार्याचे बुरखेही फाटणार आहेत.

0-0-0

# वैचारिक लेखन व सर्जनशील समीक्षेची वानवा!

जगातील सर्व क्रांतिकारी परिवर्तनांमागे साहित्यिक आणि विचारवंतांची भूमिका फार मोलाची राहिली आहे. प्रबोधनाची चळवळ म्हटले की, आपल्याला दाते आणि शेक्सपिअरची आठवण येते. दोघेही वैश्विक साहित्यिक बनले, कारण दांतेंनी इटालियन संगीताला ख्रिस्ती चर्चच्या प्रभावातून मुक्त करून धर्मनिरपेक्ष बनवले. शेक्सपिअरने आपल्या कलाकृतींच्या केंद्रस्थानी माणूस' आणला. टॉलस्टॉयसारखे महान साहित्यिक त्यांना धर्मनिरपेक्षतेचा चॅम्पियन' म्हणत. फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांत्यांचा विचार मनात येताच रुसो आणि थॉमस पेनची आठवण येते. हेगेल आणि मार्क्स तर प्रबोधनयुगाची अपत्येच. रशियन राज्यक्रांतीत आणि व्हिएतनामच्या अमेरिकन साम्राज्यशाहीच्या विरोधातील निर्णायक विजयात बौद्ध भिक्षूंच्या सह साहित्यिक कलावंतांचा मोठा वाटा होता. भारतालाही अद्याप प्रबोधनाची गरज आहे. आपल्याला आपल्या दूषित इतिहासाने जो वारसा दिला आहे. मानवताविरोधी वास्तव आपल्याला बदलायचे आहे. अन्यथा त्याची शिकार झालेली माणसे कोणालाही निवांत झोपू देणार नाहीत. देश पुन्हा अराजकाच्या उंबरठ्यावरून पुढे पाऊल टाकील.

त्यासाठी साहित्यिक-कलावंतांनाच देशाला मार्गदर्शन करावे लागेल. आपापली क्षेत्रे समृद्ध करूनही त्यांना ते करता येईल. त्यांना ही दृष्टी येण्यासाठी बदललेल्या वास्तवात खोलवर बुडी मारून जीवनानुभवांची खोली आणि व्यापकता वाढवावी लागेल. अनुभव जेव्हा खोली आणि व्यापकतेने समृद्ध होतात त्या वेळी साहित्यिक कलावंतांचे समग्र अस्तित्व, त्यांचे व्यक्तित्व आणि भावना इतक्या प्रभावित होतात की त्या युगानुयुगे वाटचाल करत आलेल्या संपूर्ण मानवजातीच्या हृदयात प्रवेश करण्याची शक्ती प्राप्त करतात. दिक्कालात राहूनही त्यापलीकडे झेप घेण्याची क्षमता अर्जित करतात. ते पूर्ण मानवी बनतात. या मानवतेच्या व्यापक भूमीवरच त्यांच्या




अनुभूतीला नवनवे अंकुर फुटतात. त्यांचे लेखन, विचार तात्कालिक, वरवरचे असत नाहीत. त्यांच्याकडूनच एकापेक्षा एक सरस साहित्यकृती जन्म घेत असतात. त्या साहित्यकृतींच्या सर्जनाचा आनंद पहिलटकरीण मातेच्या आनंदासारखा असतो. त्याच्याही जीवनात तुकारामांच्या सारखे आनंदाचे डोही आनंद तरंग' उमटू लागतात. जगण्याचे प्रयोजन साध्य होते. जीवन सार्थ आणि सुंदर बनते. तोच अनुभव त्यांच्या साहित्यकृतींना वाचताना वाचकांना येणे यातच त्यांच्या साहित्यसर्जनाचे सारसर्वस्व असते. मग साहित्यातले वाद, समीक्षेच्या फूटपट्ट्या, शास्त्रांचे नियम तोकडे पडतात आणि साहित्यिकासह त्याची साहित्यकृतीही महान ठरते.

जगाच्या पाठीवर असे साहित्यिक, विचारवंत, समीक्षक होऊन गेलेले आहेत. भारतभूमीनेही अशांना जन्म दिला आहे; परंतु भूतकाळात त्यांच्यासमोर इतिहासाने दिलेला संकुचित वारसा होता. कोणताही कलावंत त्याच्या स्थलकालातच साहित्याची निर्मिती करत असल्याने तो त्याची संपूर्ण निर्मिती स्वतःच्या इच्छेप्रमाणे करू शकत नसतो. कारण ज्या परिस्थितीत तो निर्मिती करत असतो ती परिस्थिती त्याच्यासमोर इतिहासाने वाढून ठेवलेली असते. आपल्या साहित्यातील सारे प्रवाह आणि त्यांची निर्मिती पाहिली तरी याची सत्यता पडताळून पाहता येते; परंतु आज परिस्थिती आमूलाग्र बदलत आहे. म्हणून सारेच कुंठित झालेले साहित्यप्रवाह गतिमान करायचे असतील तर साहित्यिक-कलावंत आणि विचारवंतांनी अधिक गतिमान होण्याची गरज आहे. जुन्या भांडवलावर दोन-चार कवड्या मिळवण्याचे सोडून दिले पाहिजे.

आज मराठी साहित्याकडे पाहताना समाधान आहे आणि असमाधानही आहे. अनेक महान

-डॉ.रावसाहेब कसबे


साहित्यिकांचा वारसा मराठीला मिळालेला आहे आणि जागतिक दर्जाचे साहित्य निर्माण करण्याची सूक्ष्म क्षमता असलेले अनेक तरुण साहित्यिकही वाचनात येत आहेत. म्हणून समाधान आहे. परंतु मराठी साहित्यात वैचारिक लेखनाचा आणि सर्जनशील समीक्षेचा मात्र ठणठणाट आहे. उत्तम साहित्याच्या समीक्षेसाठी उत्तम समीक्षक, विचारवंतही लागतात. समीक्षक, विचारवंत मराठीत एका हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच मला दिसतात. कदाचित माझे वाचन कमी असेल किंवा माझे अज्ञानही असेल. सर्जनशील साहित्याची समृद्धी समीक्षेच्या समृद्धीत लपलेली असते. या दोन्हीतील संवाद एकमेकांना पोषक आणि समृद्ध करणारा असतो. समीक्षक, विचारवंत होणे तुलनेने कष्टाचे काम आहे हे खरे; परंतु ते प्रयत्नसाध्य आहे. लाखाच्या वर पगार घेऊन जनतेच्या पैशावर मौजमजा करण्यापेक्षा किंवा व्यसनाधीनतेत रमण्यापेक्षा वाचन, चिंतन आणि निर्मितीत एकदा बुडून तर बघा. तिथेही तुम्हाला आनंदाचे डोह सापडतील.

०-०-०


# 'दीवाना'पासून ते 'दिलवाले' पर्यंत, २३ वर्षांत असे बदलले शाहरुखचे लुक

मुंबईः १८ डिसेंबर रोजी रिलीज झालेल्या शाहरुख खान स्टारर 'दिलवाले' या सिनेमाने रिलीजच्या पहिल्या आठवड्यांत ६५ कोटींचा व्यवसाय केला आहे. या सिनेमात शाहरुख काली आणि राजच्या रुपात दिसला आहे. त्याचा सिनेमातील लूकसुद्धा खूप वेगळा आहे. २६ जून १९९२ रोडी एसआरकेने 'कोई ना कोई चाहिए...' या गाण्याद्वारे सिल्व्हर स्क्रिनवर एन्ट्री घेतली होती. दीवाना शाहरुखचा पदार्पणातील पहिला सिनेमा होता. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. 'दीवाना'पासून ते 'दिलवाले'पर्यंत म्हणजेच या २३ वर्षांत एसआरके वेगवेगळ्या लूक्समध्ये पडद्यावर अवतरला आहे.

शाहरुख आज बॉलिवूडवर राज्य करतोय, मात्र त्याचा हा प्रवास बराच संघर्षमय होता. शाहरुखने मुंबईत अनेक दिवस संघर्ष केला. १९८५ मध्ये दिल्लीच्या हंसराज कॉलेजमधून अर्थशास्त्रात पदवी प्राप्त केल्यानंतर त्याने जामिया इस्लामिया कॉलेजमधून मास कम्युनिकेशनची पदवी प्राप्त केली. याचकाळात तो थिएटरशीसुद्धा जुळला. शाहरुख केवळ १५ वर्षाचा असताना त्याचे वडील मीर ताज मोहम्मद खान



यांचे कॅन्सरमुळे निधन झाले. त्यानंतर १९९० मध्ये त्याच्या आईनेसुद्धा या जगाचा कायमचा निरोप घेतला. आईच्या निधनानंतर १९९१ मध्ये तो मुंबईत दाखल झाला आणि त्याचा सिनेसृष्टीतील प्रवासाच्या संघर्षाला सुरुवात झाली.




१९९३ ते १९९४ पर्यंत अँटी हीरोची प्रतिमा :- शाहरुख आज सिने इंडस्ट्रीत रोमँटिक हीरोच्या रुपात ओळखला जातो. मात्र बॉलिवूड करिअरला सुरुवात केल्यानंतर वर्षभरातच त्याने 'बाजीगर' आणि 'डर' या सिनेमांतून स्वतःला अँटी हीरोच्या रुपात प्रस्थापित केले. दोन्ही सिनेमांतील त्याने साकारलेल्या भूमिकांचे विशेष कौतुक झाले. 'डर' या सिनेमातून शाहरुखची यशराज फिल्म्समध्ये एन्ट्री झाली जी आजही कायम आहे. १९९४ मध्ये शाहरुखचा आणखी एक सिनेमा रिलीज झाला होता, त्याचे नाव होते 'कभी हां कभी ना'. कुंदन शाह यांनी हा सिनेमा दिग्दर्शित केला होता. त्यानंतर रिलीज झालेल्या 'अंजाम' या सिनेमाकडे मात्र प्रेक्षकांनी पाठ फिरवली. मात्र एसआरकेचा प्रवास कायम राहिला. या सिनेमात साकारलेल्या भूमिकेने शाहरुखला बेस्ट व्हिलनचा फिल्मफेअर अवॉर्ड मिळवून दिला होता.

१९९५ मध्ये शाहरुख बनला रोमँटिक हीरो :- करिअरच्या सुरुवातीच्या काळात अँटी हीरोची भूमिका साकारल्यानंतर शाहरुखसाठी १९९५ हे वर्ष खास ठरले. यावर्षी आलेल्या राकेश रोशन यांच्या 'करण अर्जुन' आणि आदित्य चोप्रांच्या 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या सिनेमात शाहरुख झळकला. दोन्ही सिनेमांत एसआरकेने रोमँटिक हीरोच्या रुपात दिसला. हे दोन्ही सिनेमे हिट ठरले. येथूनच निगेटिव्ह शेडच्या भूमिका साकारणा-या शाहरुखला इंडस्ट्रीत रोमँटिक हीरोचा दर्जा मिळाला.

०-०-०

# सुरेश रैनाला डच्चू

## शमी, जडेजा, युवराज यांचा समावेश

नवी दिल्ली - वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि अष्टपैल, खेळाडू रवींद्र जडेजा यांचे ऑस्ट्रेलियात होणाऱ्या एकदिवसीय व ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघात पुनरागमन झाले तर मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सुरेश रैना याला एकदिवसीय संघामधून वगळण्यात आले. येत्या १२ जानेवारीपासून ऑस्ट्रेलिया दौरा सुरू होत असून भारतीय संघ पाच वन-डे आणि तीन ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी वगळण्यात आलेल्या रैनाचा ट्वेन्टी-२० मालिकेसाठीच्या संघात मात्र समावेश करण्यात आला आहे. याशिवाय, भारताचा शैलीदार फलंदाज युवराज सिंह आणि मध्यमगती गोलंदाज आशिष नेहरा यांचाही ट्वेन्टी-२० सामन्यांच्या संघात संघात समावेश करण्यात आला आहे.

नुकत्याँ झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरूद्ध कसोटी मालिकेत रवींद्र जडेजाने चमकदार गोलंदाजी केली होती. या कामगिरीच्या जोरावर जाडेजाने वन-डे आणि ट्वेन्टी-२० अशा दोन्ही संघात स्थान मिळविले. दुखापतींमुळे संघाबाहेर असलेल्या शमीनेही दोन्ही संघांमध्ये पुनरागमन केले. शमीच्या सहभागामुळे भारतीय गोलंदाजी संतुलित होण्याची अपेक्षा आहे. युवराज आणि आशीष नेहरा यांना आगामी ट्वेन्टी-२० वर्ल्ड कपच्या पार्श्वभूमीवर या मालिकेत आपल्या कामगिरीचा ठसा उमटवावा लागणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुध्दची आतापर्यंतची कामगिरी पाहूनच त्यांना ही संधी देण्यात आल्याचे जाणकारांचे मत आहे. गुरकीरत मान, रिषी धवन, बरिंदर सरन या तीन युवा खेळाडूंना वन-डे संघात स्थान देण्यात आले आहे. मध्यमगती बरिंदर सरन या एकमेव नवोदिताने एकदिवसीय संघात स्थान मिळविले आहे. ट्वेन्टी-२० संघात हार्दिक पांड्या या आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणार्या खेळाडूला देखील संधी मिळाली आहे.

एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ - शिखर धवन, रोहित शर्मा, विराट कोहली, अजिंक्य रहाणे, मनीष पांडे, महेंद्रसिंह धोनी (कर्णधार), रवींद्रन आश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद शमी, अक्सर पटेल, इशांत शर्मा, उमेश यादव, गुरकिरत सिंग, ऋषी धवन आणि बीरेंदर खान

# विरोधी पक्षांशी भाजपाचे सुडाचे राजकारण -अशोक चव्हाण

मुंबई :- भारतीय जनता पक्ष विरोधी पक्षांसोबत सुडाचे राजकारण करीत असून, हा देश या पद्धतीची दडपशाही कदापीही सहन करणार नाही, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. गि-लेपते काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी व उपाध्यक्ष राहुल गांधी यांना शनिवारी नवी दिल्लीतील न्यायालयाने विनाअट जामीन दिल्यानंतर प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना बोलत होते. काँग्रेस पक्षाची बाजू सत्य आणि स्पष्ट आहे. काँग्रेस पक्ष कायदेशीर मार्गाने न्यायालयीन लढाई लढत असून, विजय सत्याचाच होणार आहे. भारतीय जनता पक्षाने सुब्रमण्यम स्वामी यांना काँग्रेस विचारधारेला नाहक बदनाम करण्याची सुपारी दिली आहे. त्यामुळे स्वामी जे बिनबुडाचे व निखालस खोटे आरोप करतात ते खर्‍या अर्थाने भाजपचेच कारस्थान असल्याचे ते म्हणाले.

निवडणूक प्रचारात भाजपने लोकांना अनेक स्वप्ने दाखवली. परंतु आश्वासनांची पूर्तता करण्याची क्षमता नसल्याने ते काँग्रेसवर चिखलफेक करुन जनतेचे लक्ष विचलित करू पाहत आहेत. त्यासाठी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, उपाध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह अनेक नेत्यांना भाजपकडून लक्ष्य केले जात असल्याचे ते म्हणाले.

हिमाचलप्रदेशचे मुख्यमंत्री विरभद्र सिंह यांच्या मुलीचे लग्न असताना त्यांच्या घरावर सीबीआयच्या धाडी टाकण्यात आल्या. नरेंद्र मोदींचे गुजरातमधील जुने विरोधक शंकरसिंह वाघेला यांच्याही घरावर छापे टाकण्यात आले. राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत, राजस्थानचे प्रदेशाध्यक्ष सचिन पायलट, माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांचे चिरंजीव कार्ती आदींनाही याच पद्धतीने शासकीय यंत्रणांकडून वेठीस धरण्याचा प्रयत्न झाला असून मोदी सरकारने सर्वसामान्य लोकांनाही सोडलेले नाही. जी लोक विरोधात बोलतात त्यांच्या विरूद्ध देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याइतपत मजल सरकारने गाठली असल्याचे ते म्हणाले. दरम्यान काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी व उपाध्यक्ष राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ तसेच भाजपच्या सूडबुद्धीच्या राजकारणाच्या निषेधार्थ आज राज्यातील सर्व जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक रस्त्यावर उतरले.

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी दिल्ली, मुंबई मध्ये तणाव निर्माण झाला आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी निर्देश दिलेले असतानाही काँग्रेस कार्यकर्त्यांनी काँग्रेस मुख्यालयासमोर आज दुपारी शक्तिप्रदर्शन केले. यावेळी खेरवाडी जंक्शन, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, बांद्रा पूर्व येथे काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजप सरकार विरोधात घोषनाबाजी केली. मुंबई काँग्रेस अध्यक्ष संजय निरुपम यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. या आंदोलनात काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते.

तर मुंबईत वांद्रे खेरवाडी येथेही काँग्रेस कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. काँग्रेस नेते नारायण राणेंच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना मुद्दाम या प्रकरणात अडकवले जाते, अशी टीका राणेंनी केली आहे. या आंदोलनात काँग्रेस मुंबई अध्यक्ष संजय निरूपम आणि माजी खासदार आणि आमदारही सहभागी आहेत. काही ठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर टायर जाळण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी आंदोलकांकडून टायर ताब्यात घेतले आहेत. तर नवी दिल्ली येथे मुख्यालयासमोर काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली असून ते केंद्र सरकारविरोधात घोषणा दिल्या.

# सांस्कृतिक दहशतवाद अस्वस्थ करणारा

पुणे: सांस्कृतिक दहशतवादाला कळत नकळत राज्यकर्त्यांकडून दिला जाणारा पाठिंबा अस्वस्थ करणारा आहे. पुरस्कार वापसीच्या माध्यमातून व्यक्त केली जाणारे तीव्र भावना चुकीची नाही,असे मत ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

प्रतिमा पब्लिकेशन्सतर्फे प्रा.फ.मुं. शिंदे यांच्या फ. मुं. शिंदे समग्र कविता संग्रह खंड - १' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात पवार व शिंदे यांची प्रा. मिलिंद जोशी यांनी मुलाखत घेतली. पिंपरी चिंचवड येथील साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. श्रीपाल सबनीस, स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, लीला शिंदे , करण ग्रुपचे अध्यक्ष कल्याण तावरे, दीपक चांदणे,आदी उपस्थित होते.

सांस्कृतिक दहशतवादावरील प्रश्नावर बोलताना पवार म्हणाले, कला हे माध्यम असून कलेच्या माध्यमातून काही गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला जातो. बाजीराव मस्तानी चित्रपटाचे शो बंद पाडणे अयोग्य आहे. तुम्हाला पसंत नाही तर तुम्ही पाहू नका. परंतु ,ज्यांना चित्रपट पहायचा आहे , त्यांना अडवू नका. एखाद्या कलाकृतीतील प्रत्येक मताशी आपण सहमत असूच असे होत नाही. त्यातच राज्यकर्त्यांकडून अशा गोष्टींना कळत नकळत पाठिंबा दिला जातो. ही गोष्ट अस्वस्थ करणारी आहे. घाशीराम कोतवाल नाटकाच्या वेळीही विरोध झाला होता. त्यामुळे मीच ते नाटक पाहण्यासाठी गेलो. पुढे ते नाटक जागतिक पातळीवर गेले.

पुरस्कार वापसीवर बोलताना पवार म्हणाले, राज्यकर्त्यांकडूनच केवळ पुरस्कार परत करून का तर पुरस्काराबरोबर देण्यात आलेली रक्कम व्याजासह परत करा,अशा प्रकारे सत्ताधा-यांकडून चमत्कारिक वक्तव्य केले जाते.त्यातून संबंधितांचा दृष्टीकोन लक्षात येतो. त्यामुळे ,समाजातून तीव्र मत व्यक्त केले तर त्यात चुकीचे काही नाही.''

माझा मुळ विषय गणित होता. परंतु. परिस्थितीनुरूप गणित बदलत गेले ,असे सांगत फ.मुं.शिंदे म्हणाले, बहुतांश सर्व विद्यापीठांमध्ये माझ्या कविता अभ्यासक्रमासाठी ठेवण्यात आल्या. काही विद्यार्थ्यांनी माझ्या साहित्यावर पीएच.डी.केली. तसेच माझ्या लिखाणाचेही नेहमी स्वागत केले आहे. निवडणुकीची आवड असल्याने मी अपक्ष उभा राहिलो. संधी मिळाली तर नकीच राजकीय क्षेत्रात काम करायला आवडेल.''

# जेटलींनी केजरीवालांविरोधात दाखल केला मानहानीचा खटला

नवी दिल्ली- दिल्ली डिस्ट्रीक्ट क्रिकेट असोसिएशनमधील (डीडीसीए) गैरव्यवहाराबाबत चुकीचे आरोप केल्याने केंद्रीयमंत्री अरुण जेटली यांनी सोमवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला आहे.

जेटली यांनी दिल्ली उच्च न्यायालयात केजरीवाल यांच्यासह कुमार विश्वास, आशुतोष, संजय सिंह, राघव चड्डा आणि दीपक वाजपेयी यांच्याविरोधात खटला दाखल केला. त्यामुळे हे नेते अडचणीत येण्याची शक्यता आहे.

आपने या खटल्याविरोधात बोलतांना आपण याला घाबरत नसल्याचे म्हटले आहे. भाजपचे खासदार किर्ती आझाद यांनी आपल्यावर खटला दाखल करण्याचे आव्हान जेटलींना दिले आहे.

अरुण जेटली १३ वर्षे अध्यक्ष असलेली दिल्ली डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन म्हणजे भ्रष्टाचाराचे भयंकर आगर होते. डीडीसीएने बनावट कंपन्यांना कंत्राटे देऊन कोट्यवधींचे गैरव्यवहार केल्याचा घणाघाती आरोप आझाद यांनी केला आहे.

0-0-0

# अयोध्येत राम मंदिर उभारण्यासाठी गुजरात-राजस्थानातून मागविले दगड

अयोध्या (उत्तर प्रदेश)- अयोध्येत राम मंदिर उभारण्याच्या हलचाली सुरु झाल्या आहेत. गुजरात व राजस्थानातून दगड मागविण्यात असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी गृहमंत्रालयाकडून अहवाल मागवला आहे. परमेश्वर कृपेने राम मंदिर उभारण्याची योग्य वेळ आली असल्याचे रामजन्म भूमी ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपालदास यांनी म्हटले आहे. राम जन्म भूमीचा वाद न्यायप्रविष्ठ आहे. राम मंदिर प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. मंदिर परिसरात बांधकामावर बंदी आहे. राम मंदिरासाठी २.२० लाख ब्रास दगडाची आवश्यकता आहे. १.२ लाख ब्रास दगडावर कोरीवकाम करण्यात आले आहे.

# २४ व ३१ डिसेंबरला बार पहाटेपर्यंत सुरू राहणार

मुंबई : मुंबईत २४ आणि ३१ डिसेंबरला बार आणि रेस्टॉरंट पहाटेपर्यंत सुरु ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे. यानुसार पहाटे पाचपर्यंत बार आणि रेस्टॉरंट मालकांना आपली दुकाने सुरु ठेवता येतील. सि१-शिसमात्र यावेळी तळीरामांवर नजर ठेवण्यासाठी शहरातल्या शंभर ठिकाणांवर नाकेबंदीही केली जाणार आहे. उत्पादन शुल्क विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. तसंच या काळात बनावट मद्याचा पुरवठ्यांवरही उत्पादन शुल्क विभागाची नजर राहील, असे सांगण्यात आले आहे. दरवर्षाच्या वर्षअखेरीस बार आणि रेस्टॉरंटच्या वेळापत्रकावर मर्यादा घातल्या जातात. त्यानंतर बार संघटना कोर्टात जावून पहाटेपर्यंत बार सुरु ठेवण्याची परवानग्या मिळवतात. मात्र यंदा पहिल्यांदाच उत्पादन शुल्क विभागाने परिपत्रक काढून बार पहाटे पाचपर्यंत उघडे ठेवण्यास परवानगी दिली

संपर्क :-
**न्यायस्वातंत्र्य समता**
चोरडीया बिझनेस सेन्टर
केबिन नं.२, सोमवार पेठ,
पुणे-४११ ००१.
मो.: ९५६१९२४३२३
मो.: ९८९०९१२०७०

# संजय दत्त मार्चमध्येच तुरुंगातून सुटणार खुद्द कारागृह महासंचालकांची माहिती



पुणे- मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणी पाच वर्षाची शिक्षा भोगत असलेल्या अभिनेता संजय दत्तची वर्तणूक चांगली असल्याने तो निर्धारित वेळेपेक्षा म्हणजे दीड वर्ष अगोदर येत्या मार्च महिन्यात येरवडा जेलमधून बाहेर येऊ शकतो, अशी माहिती कारागृह विभागाचे अतिरिक्त महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांनी दिली.

जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत रविवारी लातूर येथे बोलताना उपाध्याय यांनी ही माहिती दिली. संजय सध्या पुण्यातील येरवड्याच्या जेलमध्ये शिक्षा भोगत आहे. राज्यातील कारागृह आणि त्याच्या सद्य:स्थितीचा आढावा घेताना उपाध्याय म्हणाले, जेल मॅन्युअलनुसार प्रत्येक कैद्याचे वर्षभरातील ८४ दिवस माफ केले जातात. तसेच कैद्याची तुरुंगातील वर्तन चांगले असेल तर प्रत्येक वर्षी आणखी ३० दिवसांची शिक्षा माफ केली जाते. त्यामुळे संजय दत्तची जवळपास दीड वर्षाची शिक्षा कमी होऊन तो आपल्या घरी येऊ शकतो. संजय दत्तला यापूर्वी अनेकदा पॅरोल आणि संचित रजा देण्यात आली होती. त्यावरूनही मोठी चर्चा झाली होती. त्यावर उपाध्याय यांनी हे सारे नियमानुसारच घडल्याचा निर्वाळा दिला. महाराष्ट्रातील कारागृहांची माहिती देताना ते म्हणाले राज्यात ५३ कारागृह असून त्यात सेंट्रल जेलची संख्या आठ आहे.

शिक्षा भोगत असलेल्या एकूण कैद्यांपैकी ९० टक्के कैदी रागात, तडकाफडकी गुन्हे करतात. त्यामुळे गुन्हेगारी कारवाया केल्यानंतर त्यांना पश्चात्ताप होतो आणि ते सरळमार्गी बनतात. परंतु उर्वरित १० टक्के गुन्हेगार ठरवून गुन्हे करतात. मुळात ते हिंसक, आक्रमक असतात. त्यामुळे त्यांची वैद्यकीय तपासणी करून प्रवृत्तीत बदल करण्यासाठी डॉक्टरांच्या मदतीने उपाययोजना करणार आहे. कैद्यांना योगा, धार्मिक प्रवचनातूनही चांगल्या मार्गाला लावण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.